**प्रेस नोट** पोलीस अधीक्षक कार्यालय धुळे

दिनांक :-२१/०३/२०१६

**होळी,धुलीवंदन,गुडफ्रायडे व शिवजंयती उत्सव निमित्त केलेली प्रतिबंधक कार्यवाही बाबत.**

दि.२३/३/२०१६ रोजी होळी दि.२४/३/२०१६ रोजी धुलीवंदन व दि.२६/३/२०१६ रोजी शिवजयंती उत्सव साजरे होत असल्याने सदर सण उत्सव मध्ये सार्वजनिक शांतता भंग होवुन कायदा व सुव्यवसथेचा प्रश्न निर्माण होवु नये या करीता समाजकंटक, शरीरा विरुध्दचे गुन्हे करणारे व कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे इसमा विरुध्द प्रचलीत कायदया अन्वये कार्यवाई करणे चालु आहे.

त्या अुनषंगाने धुळे जिल्हयात खालील प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| Crpc १०७ प्रमाणे | ६३१ सर्व प्रशांतता बिघडु नये करिता बंधपत्र |
| Crpc १०९ प्रमाणे | २७ संशयीत इसमा कडुन सद वर्तनाचे बंधपत्र |
| Crpc ११० प्रमाणे | ३० सवयीच्या गुन्हेगारांकडुन सद वर्तन करिता बंधपत्र |
| Crpc १४९ प्रमाणे | ११५ व्यक्तीना नोटीसा बजावण्यात आल्या आहे. |
| Crpc १५१(१) प्रमाणे | ०४ दखलपात्र अपराध्यास प्रतिबंध करणे कामी स्थानबध्द |
| Crpc १४४(२) प्रमाणे | १०३ विशिष्ट प्रदेशातुन निघुन जाणे बाबत हद्दपार आदेश |
| मुं.पो.ॲक्ट ५६ प्रमाणे | १७ हद्दपार आदेश |
| मुं.दारुबंद.ॲक्ट९३ प्रमाणे | १६ हद्दपार आदेश |

या प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असुन,Crpc १०७ व ११० मध्ये सार्वजनिक शांतता राखणे साठी त्यांचे कडुन जामिनदारासह बंधपत्र भरून घेतलेले आहेत.तसेच मा.पोलीस अधिक्षक धुळे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ प्रमाणे दि.२२/३/२०१६ चे ००.०० वा.पासुन ते २८/३/२०१६ चे २४.००वा पावेतो लागु करण्यात आले आहे. व मुं.पो.का.क.१९५१ चे कलम ३६(इ)(ई-अ) प्रमाणे दि.२३/३/२०१६ होळी दि.२४/३/२०१६ धुलीवंदन दि.२५/३/२०१६ गुडफ्रायडे व दि.२६/३/२०१६ तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव अन्वये ध्वनीक्षेपणाचा (डीजे आवाज मोठा असुन नये) नियम वअटी बाबत आदेश काढले आहेत.तसेच मा.जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी धुळे यांनी दि.१८/३/२०१६ चे००.०१ वा. पासुन दि.३१/३/२०१६ चे २४.०० वा पावेतो ३७(१)(३) प्रमाणे मनाई आदेश निर्गमित केले आहेत.व मा.जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम अंतर्गत दि.२४/३/२०१६ रोजी धुलीवंदनचे दिवशी सायंकाळी ०५.००वा.व दि.२६/३/२०१६ रोजी पुर्ण दिवस दारु दुकाने बंद ठेवण्याचे आदेश पारीत केले आहेत. वरील आदेशाचे नागरीकांनी तंतोत पालन करणे आवश्यक आहे.

सन२०१५ मध्ये एकुण २७ हद्दपार प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी (SDM) धुळे व शिरपुर याचे कडेस पाठविण्यात आलेले आहेत . तसेच सन २०१६मध्ये १७ हद्दपार प्रस्ताव (SDM)

धुळे व शिरपुर याचे कडेस पाठविण्यात आले असुन सदरचे हद्दपार प्रस्ताव बाबतचा निर्णय (SDM) सो,हे घेत असतात.

मोक्का प्रस्ताव सन २०१५ मध्ये दोन गुन्हेगारी टोळ्यां विरुध्द पाठविला आहे.तडीपाराचे प्रस्ताव तयार करुन पोलीस ठाण्या कडुन पोलीस अधिक्षक कार्यालयात येतात व त्याची छाननी होवुन प्रांतअधिकारी (SDM) यांचे कडेस अंतिम आदेशासाठी पाटविले जातात.गुन्हेगाराला तडीपार करावयाचे किंवा नाही या बाबत अंतिम निर्णय प्रांतअधिकारी हे घेत असतात. सन २०१५ मध्ये पोलीस अधिक्षक कार्यालयात एकुण २७ तडीपार करण्याचे आले असता त्याची छाननी करुन २७ प्रस्ताव प्रांतअधिकारी यांचे कडे पाठविण्यात आले आहे. सन२०१६ मध्ये अता पर्यत १४ प्रस्ताव प्राप्त झाले असुन त्याचे अंतिम निर्णयासाठी मा.प्रांतअधिकारी याचे कडे पाठविण्यात आले आहेत.या मध्ये एक ही प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालयात रद्द केलेला नाही.

आता पर्यत प्रातंअधिकारी यांचे कडेस एकुण ४४ प्रस्ताव प्रलंबित असुन त्या मध्ये त्यांना नोटीसा अदाकरावयाचे व सुनावणीचे काम चालु आहे. तसेच सन २०१४ मध्ये धुळे शहर पोलीस ठाणे गरनं ६१/२०१४ भा.दं.वि.क. ३९५,३८५ आर्म ॲक्ट कलम ३/२५ वैगरे मध्ये एकुण ८ आरोपीतां विरुध्द मोक्का प्रस्ताव पाठविण्यात आला होता.अलीकडेच मा.विशेष मोका न्यायालय नाशिक यांनी निकाल दिला असुन त्या ४ आरोपीतां ५ वर्षाची शिक्षा व ५ लाख दंडाची शिक्षा सुनावली आहे.सन २०१५ मध्ये २ गुन्हेगारी टोळ्यान विरुध्द प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.सन २०१६ मध्ये २ गुन्हेगारी टोळ्यान विरुध्द मोक्याचा प्रस्ताव पाठविण्याचे काम चालु आहे.

सदर सण उत्सव हे शांततेत साजरे व्हावे या करीता यापुढे देखिल वरील प्रकारचे उपद्रवी इसमान विरुध्द पोलीस कार्यवाही सुरुच राहणार आहे.जो कोणी शहरातील व जिल्हयातील सार्वजनिक शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न करील त्यांची गय केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर सण उत्सव काळात शहरात व जिल्हयात खालील प्रमाणे कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

| | |
|---|---|
| पोलीस अधिक्षक | - १ |
| अपर पोलीस अधिक्षक | -१ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी | -३ |
| पोलीस निरीक्षक | -१७ |
| सहाय्यक पोलीस नीरीक्षक | -२५ |
| पोलीस उप निरीक्षक | -५० |
| पुरुष पोलीस कर्मचारी | -१०७० |
| महिला पोलीस कर्मचारी | - ७५ |
| पुरुष होमगार्ड | -५०० |
| महिला होमगार्ड | -१०० |
| एस.आर.पी. कंपनी | - १ |
| स्ट्राकिंग फोर्स | -३ |